पुण्यनगरी

# युरोपियन युनियन व्यवस्थापकांची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर :** युरोपियन युनियनच्या इरॅस्मस प्लसने अर्थसाहाय्य केलेल्या प्रकल्पाविषयी अधिक माहिती देण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक अल्डा टॉलुमी आणि सिलिया ग्वाटेमेलो यांनी शिवाजी विद्यापीठास दोन दिवसीय भेट दिली.

शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग युरोपियन युनियनच्या 'मिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ फोर्थ इंडस्ट्रियल रिव्हॉल्युशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टीचर्स' या प्रकल्पामध्ये काम करत आहे. याअंतर्गत विभागाला १ कोटी २६ लाख इतके अर्थसाहाय्य मिळणार आहे. या प्रकल्पाचे नियोजन, तसेच माहिती देण्यासाठी व्यवस्थापकांनी भेट दिली. त्यांनी शिक्षणशास्त्र विभागातील अध्यापक, संशोधकांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान व्यवस्थापकांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचीही सदिच्छा भेट घेतली. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते. इनोव्हेशन मॅनेजर गीतांजली जोशी यांनी आभार मानले.

08 OCT 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात तांत्रिक कौशल्याची देणगी

## मध्यवर्षी युवा महोत्सवाच्या पारितोषिक प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांना कोरोनाच्या सावटातून बाहेर काढून पुन्हा त्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्याच्या दृष्टीने युवा महोत्सवाचे आयोजन करणे, विद्यापीठाला गरजेचे वाटत होते. त्यावर ऑनलाईन युवा महोत्सव हा तोडगा काढला. विद्यार्थ्यांना यंदा कलागुणांबरोबरच तांत्रिक कौशल्यांची एक वेगळीच देणगी मिळाली असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना विवेकानंद महाविद्यालयाचा संघ.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा विद्यापीठात पार पडला. विवेकानंद महाविद्यालयाने युवा महोत्सव २०२०-२०२१ चे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले असून या संघास माजी कुलगुरू स्व. आप्पासाहेब पवार फिरता चषक, प्रशस्तीपत्रे देऊन गौरवले.

शहीद तुकाराम ओंबाळे मृतिचिन्ह पुरस्कार प्राप्त चारुकेशी चव्हाण यांचा सत्कार केला. संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी आभार मानले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### विविध कलाप्रकारातील विजेते

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागवार विजेतेपदाचा फिरता चषक प्रदान करण्यात आला. वाङ्मय प्रकारासाठीचा पुरस्कार मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, श्रीमती कुसुमताई पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर आणि सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांना विभागून दिला. संगीत प्रकारातील पुरस्कार देशभक्त रत्नाप्पा कॉलेज ऑफ कॉमर्स यांना, नृत्य प्रकारातील पुरस्कार श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली यांना, कला प्रकारातील पुरस्कार मुधोजी कॉलेज, फलटण यांना तर नाट्य प्रकारातील पुरस्कार मुल्ला लॉ कॉलेज, सातारा व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांना दिला.

तरूण भारत

# हवामान बदलांमुळेच पर्जन्यमानात वाढ

■ डॉ. सचिन पन्हाळकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

हवामान बदलाचा परिणाम म्हणून पंचगंगा खोऱ्यात साळवण व इचलकरंजी या ठिकाणी सन २०१९ मध्ये क्षमतेपेक्षा जास्त पावसाची नोंद झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पर्जन्याचे स्वरूप, त्याची तीव्रता, कालावधी, प्रवणक्षेत्र यांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडिज्"चे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले.

विद्यापीठातील केंद्रामार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास" या ऑनलाईन व्याख्यानमालेत 'पंचगंगा महापूर: कारणे व उपाय" या विषयावर ते बोलत होते. पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. डी. राऊत अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पन्हाळकर म्हणाले, अचूक पर्जन्य माहितीच्या आधारे रन ऑफ मॉडेल, फ्लड मॉडेल अशा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून



महापुराची तीव्रता कमी केली जाऊ कमी कालावधीत पडणाऱ्या पावसामुळे केवळ भारतासह अन्य देशात पूर धोका वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा संभाव्य धोका ओळखला जाऊ शकतो. ही समस्या दूर करण्यासाठी कॅसकेड धरणांची शृंखला निर्माण करण्याची गरज आहे. अलमट्टी धरणाचा पंचगंगा पुरावर फारसा परिणाम होत नसून जास्त ग्रेडीएंटमुळे कृष्णा नदी पुराच्या वेळी पंचगंगेतील पाणी स्वीकारू शकत नाही. परिणामी, बॅकवॉटर इफेक्ट वाढून पूर परिस्थिती उद्भवते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजित पाटील यांनी केले. यावेळी देशभरातून विविध विद्यापीठांतील अभ्यासक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.